श्री.संदिप विठठल फुलकर, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांनी कार्यालयीन कामी गैरहजर राहून गैरवर्तन केल्याने शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक सा.बां/आस्था-२/१९७/२०२४
दिनांक २४/०४/२०२४

वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४
२. इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्र/बांध/का१/आस्था५/१९२२/४३०/२०२२ दिनांक १८/०७/२०२२
३. इकडील आदेश क्र.सा.बा./आस्था-२/५९६/२०२२ दिनांक १६/११/२०२२
४. सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा ४/खाचौ/सी.आर. २५३/२०२२ दिनांक २२/०८/२०२३
५. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साबां/आस्था-२/१४०/२०२४ दिनांक १३/०२/२०२४

श्री.संदिप विठठल फुलकर, जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग, श्रीरामपुर येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर कार्यरत असतांना कार्यालयीन कामी गैरहजर राहून गैरवर्तन केल्याने वरिल संदर्भ क्र.२ अन्वये ज्ञापन/दोषारोप बजविण्यात आले होते. सदर ज्ञापन/दोषारोपाचा खुलासा श्री.फुलकर यांनी सादर केला नाही. त्यामुळे श्री.फुलकर यांचे विरुध्द संदर्भ क्र.३ अन्वये विभागीय चौकशी सुरु करणे कामी विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांनी सदर प्रकरणी चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल वरिल संदर्भ क्र.४ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर चौकशी अहवालानुसार श्री.फुलकर यांचेवर ठेवणेत आलेले सर्व तीनही आरोप सिध्द होत असलेचे निष्कर्ष प्राप्त झालेले आहे. त्यानुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविणेत येऊन सदर प्रकरणी वरिल संदर्भ क्र.५ नुसार श्री.फुलकर यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन खुलासा सादर करण्याची संधी देण्यात आलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत श्री.फुलकर यांनी कुठल्याही प्रकारचा खुलासा या कार्यालयास सादर केलेला नाही. श्री.फुलकर यांनी कार्यालयीन कामी गैरहजर राहून गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा वर्तणुक नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेने शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे नियुक्ती प्राधिकरणाचे मत झाले आहे.

सबब श्री.संदिप विठठल फुलकर, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना अंतिम कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद केलेनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (७) नुसार सेवेतून बडतर्फ करणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करणेत येत आहे.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202404241300 28 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रति,
श्री.संदिप विठठल फुलकर,स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
व्दारा उप अभियंता,जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग,श्रीरामपुर

प्रत:- उप अभियंता,जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग,श्रीरामपुर
२/- सदरचा आदेश श्री.फुलकर यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद श्री.फुलकर यांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

Scanned with OKEN Scanner